**<u>नियमित दिवाणी दावा नं. १९/२०२०</u>**

**<u>निशाणी क्रमांक ४८ वरील आदेश</u>**

**<u>सी.एन.आर.क्र. MHK0110002432020</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, क्रम ६ नियम १७ सह कलम १५१ अन्वये दावा दुरूस्ती करणेकामी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुद्ध कायम मनाई करीता दाखल केला आहे. वादी यांनी त्यांच्या खरेदीपत्राआधारे व दावामध्ये त्यांनी तथाकथीत खरेदी केलेली दावा मिळकत क्षेत्र हे पूर्वी झालेल्या कथीत तोंडी वारसानुसार खरेदीपत्र केलेचे कथन केले आहे. प्रतिवादी यांनी दावा मिळकतींची सत्य वस्तुस्थिती मांडून त्याकामी वादी यांचे दावा मिळकतीचे हक्क नाकारलेले आहे. प्रतिवादी यांना नुकतेच दोन दिवसांपूर्वी त्यांचे जुने अडगडळीचे खोलीमध्ये असलेले कपाटामध्ये साफसफाई करताना कागदपत्राचे गठ्ठ्यात त्यांना वादी यांचे दावेतील व खरेदीपत्रातील तोंडी वाटपाचे लेखी स्मरण वाटणीपत्राचा लेख दिनांक ११/०१/१९८८ दस्ताची अस्सल प्रत जी वादी यांचे पूर्व मालकदार श्रीमती बनाबाई बुवा यांनी स्वत: दस्तुरीने विशेष कार्यकारी दंडाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे लिहून दिलेले अस्सल दस्त सापडला आहे त्यामुळे प्रतिवादी यांच्या कैफियत, म्हणणे व प्रतिदावेचे कलम १ नंतर १(अ) असा करणेत येवून अर्जात नमुद केलेला मजकुर समाविष्ठ करणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.५७ कडे दाखल केले असून वादीचे कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांना सदर दुरुस्ती अर्ज दाखल करणेचा कोणताही लोकस स्टँडी नाही. प्रतिवादी यांनी केवळ काम लांबविणेकरीता तसेच गुंतागुंत निर्माण करणेकरीता सदर अर्ज दाखल केला आहे. निशाणी क्र.५ व निशाणी क्र.३४ चे तुर्तातुर्त मनाई अर्जावर दोन्ही पक्षकारांनी तोंडी

युक्तीवाद केला आहे. सदर दोन्ही अर्ज निकालावर प्रलंबित आहेत. तसेच प्रतिवादी यांनी सदर अर्ज कामी गुंतागुंत होणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत कलमात नमुद केलेप्रमाणे मिळकतीमध्ये कोणतेही समाज मंदीर नसल्यामुळे त्याकरीता प्रतिवादीकडे क्षेत्र ठेवणेचा प्रश्नच उद्भवत नाही. प्रतिवादी हे सदर क्षेत्र कधीही स्वतंत्रपणे उपभोगत नाहीत. तसेच प्रतिवादी यांनी कामी हजर केलेले मृत्यूपत्र पाहता प्रतिवादी व इतर सहहिस्सेदार यांचे दरम्यान कोणताही लेखी वाटणीपत्राचा दस्त झालेला नाही. केवळ न्यायनिर्णयाची सुनावणी लांबविण्याच्या हेतूने सदरचा अर्ज दिला आहे. सबब, प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

**४.** वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** दोन्ही बाजूंची कथने विचारात घेता अर्जाचे निकाल निश्चीतीकरिता खालील वादप्रश्न उपस्थित झाले त्यांचेवरील निष्कर्ष आणि कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| **अ.क.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्थावित सुधारणा मंजूर करणे न्यायोचित ठरते का ? | **होय** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**<u>वादप्रश्न क्र. १ करिता</u> :**

**६.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचेविरूध्द यांच्याविरुद्ध कायम मनाई करीता दाखल केला आहे.

**७.** दिवाणी प्रकिया संहिता क्रम ६ नियम १७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्याच्या कोणत्याही स्थितीमध्ये कोणताही पक्षकार त्याच्या

कथनामध्ये जर दाव्याचे मुळ स्वरूप बदलत नसेल तर आवश्यक ती दुरूस्ती करू शकतो. सदरची दुरूस्ती ही पक्षकारांचा मुळ प्रश्न उकल करण्याकरिता गरजेची असणे आवश्यक आहे.

८. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी अर्जात कथन केल्याप्रमाणे नमुद मजकूर समाविष्ट करुन मागत आहेत. प्रस्तुत प्रस्तावित सुधारणा मंजूर केल्याने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. प्रस्तुत प्रकरणात अद्याप पर्यंत वादी व प्रतिवादी यांच्या तुर्तातुर्त मनाई अर्जांवर सुनावणी झालेली नाही. दाव्याचा अंतिम निकाल गुणदोषावर लागण्याकरिता प्रस्तावित सुधारणा न्याय्य असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता वादप्रश्न क्र.१ करिता मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र. २ करिता</u> :**

९. वरील कारणांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये १०००/– वादीस दिल्यानंतर मंजूर करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज (निशाणी क्र.४८) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या खर्चापोटी वादीस रक्कम रुपये १०००/– द्यावेत.

३. प्रतिवादी यांनी आदेशापासून १४ दिवसांमध्ये प्रस्तुतची दुरुस्ती करुन कैफियत आणि प्रतिदावा दुरुस्त प्रत दाखल करावी.

JYOTI NITIN BHASME

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2025.11.13 10:57:41 +0530

**पेठ–वडगांव.** **( जे.एन. भस्मे )**

**दिनांक १०/११/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**